देशोन्नती दि. १५/१२/२०१९

दै. देशोन्नती दि. १५/१२/२०१९



# मुखेड पोलिसांनी केली खंडणी बहाद्दरास २४ तासात अटक

**मुखेड** ▪ शहर प्रतिनिधी

शहरातील हॉटेल आराम बार अँड रेस्टॉरंट येथे येऊन प्रतिमहा ३ हजार रुपयांची खंडणी मागणाऱ्यास १२ डिसेंबर रोजी गुन्हा दाखल झाल्यानंतर १३ डिसेंबर रोजी २४ तासाच्या आत खंडणी बहाद्दरास अटक करण्यास पोलिसांना यश आले आहे.

शहराच्या मध्यभागी आराम हॉटेल असून श्रीकांत गरुडकर (३४) रा. मुखेड यांनी दिलेल्या तक्रारीनुसार नदीम शेख (२९)रा. मुखेड हा १० डिसेंबर रोजी सायंकाळी ४.१५ वाजता हॉटेलमध्ये येवून प्रतिमहा ३ हजार रुपयाची खंडणी मागणी केला. त्यास देण्यास नकार दिला असता, हॉटेलमधील नौकरास लाथाबुक्यांनी मारहाण केली व हॉटेल मधील काचेचे ग्लास, फायबर खुर्च्या असे सामानाची तोडफोड करुन जवळील चाकून काढून धमकी दिली व दहशत तयार केली. याबाबत मुखेड पोलिसात फिर्यादीच्या फिर्यादीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल होताच पोलिसांनी तात्काळ सुत्र हलवून आरोपीस १३ डिसेंबर रोजी सायंकाळी ५.२५ वाजता अटक करुन पोलीस कोठडीत रवानगी केली. या प्रकरणाचा तपास मुखेड पोलिस निरीक्षक नरसिंग आकुसकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक गणपत चित्ते हे करीत आहेत.